प्रेस नोट

जळगांव शहर पो.स्टे.
दि.२९ /०८ /२०२५

प्रति.
मा.संपादक सो.
दैनिक -------------

**विषय - जळगांव शहर पोलीस गुन्हे शोध पथकाची उल्लेखनीय कामगीरी चोरी करणारे अट्टल चोरटे जेरबंद**

जळगाव शहर पोलीस स्टेशन हददीत दि. २४/०८/२०२५ रोजी ०९.३० ते दि. २५/०८/२०२५ रोजी सकाळी ०६.३० वा.चे दरम्यान जळगांव शहरातील हमाल वाडा मारुती मंदीर जवळ शिवाजी नगर जळगाव येथुन फिर्यादीची १) ३०,०००/- रु किंमतीची होन्डा कंपनीची अॅक्टीव्हा ४ जी सिल्व्हर रंगाची मोपेड गाडी क्र एम पी ०४ एस वाय ७९५० ही चोरी झालेली होती. व त्या अनुषंगाने फिर्यादी उदयकुमार सुभाष कोचुरे वय ४५ वर्ष, व्यवसाय -वाहन चालक, रा. हमला वाडा, मारुती मंदीर जवळ शिवाजी नगर, जळगाव यांच्या फिर्यादवरुन शहर पो.स्टे. येथे गुरनं ३२१/२०२५ BNS कलम ३०३(२) प्रमाणे दिनांक २६/०८/२०२५ गुन्हा दाखल करण्यात आलेला होता.

नमुद गुन्ह्यात मिळालेल्या माहीती नुसार चोरट्याचा मा.पोलीस अधीक्षक श्री माहेश्वर रेड्डी सो., मा. अप्पर पोलीस अधीक्षक सो. अशोक नखाते सो., उप विभागीय पोलीस अधिकारी श्री नितीन गणापुरे सो., मा.पोलीस निरीक्षक सागर शिंपी यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शोध पथकाचे सफौ/सुनिल पाटील, पोहेकॉ/उमेश भांडारकर, पोहेकॉ/सतिश पाटील, पोहेकॉ/ योगेश पाटील, पोहेकॉ/विरेंद्र शिंदे, पोहेकॉ/ नंदलाल पाटील, पोहेकॉ/भगवान पाटील, पोना सुधीर साळवे, पोकॉ अमोल टाकुर, पोकॉ/भगवान मोरे, पोकॉ /प्रणय पवार, पोकॉ. राहुलकुमार पांचाळ यांना तपासाबाबत योग्य त्या सुचना दिल्या व त्यानुसा गुन्हे शोध पथकाचे दोन टीम तयार केल्या. मा. पोलीस निरीक्षक श्री सागर शिंपी साहेब यांना मिळालेल्या गुप्त बातमीदारा मार्फत गुन्हे शोध पथकातील कर्मचारी यांनी आरोपीताचा शोध घेवुन त्यास पोलीस स्टेशनला आणुन विश्वासात घेवुन विचारपुस केली असता त्याने त्याचे नाव इरफान खॉ उस्मान खॉ पठाण वय २१ वर्ष, रा.मुळ रा साक्री ता साक्री जिल्हा धुळे, ह.मु. गेंदालाल मिल जळगाव असे सांगुन जळगाव शहर पोस्टेला दाखल गुन्हयातील होन्डा कंपनीची अॅक्टीव्हा ४ जी सिल्व्हर रंगाची मोपेड गाडी क्र एम पी ०४ एस वाय ७९५० ही त्याचा मित्र अदिल शेख उर्फ नाटया माजिद शेख वय १९ वर्ष, रा गेंदालाल मिल जळगाव याचे सह चोरी केल्याची कबुली दिली असुन सदर गाडी जप्त करुन त्यास अटक केली आहे.

तसेच यातील आरोपी क्र.०१ **इरफान खॉ उस्मान खॉ पठाण** वय २१ वर्ष, रा.मुळ रा साक्री ता साक्री जिल्हा धुळे, ह.मु. गेंदालाल मिल जळगाव यास पोलीस कस्टडी दरम्यान विश्वासात घेवुन इतर ठिकाणी चोरी केले बाबत विचारपुस केली असता, त्याने एकटयाने नोव्हेंबर २०२४ मध्ये साक्री पोलीस स्टेशन जिल्हा धुळे या हददीतुन एक हिरो होन्डा कंपनीची फॅशन प्रो काळया निळया रंगाची मोटर सायकल क्र. एम एच १९बी बी ७८४१ ही चोरी केल्याची कबुली दिली. सदर मोटर सायकल चोरी बाबत साक्री पोलीस स्टेशन येथे ३९२/२०२४ बी एन एस कलम ३०३ (२) प्रमाणे गुन्हा दाखल असुन सदर मोटर सायकल ही जप्त करण्यात आली आहे.

| पोलीस स्टेशन व गुरंन. | पोलीस स्टेशन व गुरंन. |
|---|---|
| **जळगाव शहर पो. स्टे. गुरनं.३२१/२०२५<br>BNS ३०३(२ ) प्रामणे** | **साक्री पोलीस स्टेशन गु.र.नं. ३९२/२०२४<br>BNS ३०३(२ ) प्रामणे** |

अशा प्रकारे जळगांव शहर पो.स्टे. मा. पोलीस निरीक्षक सो. सागर शिंपी साहेब यांना मिळालेल्या गुप्त बातमीदारा मार्फत व मार्गदशनाने गुन्हे शोध पथकाकडुन चोरीस गेलेल्या जळगांव शहर पो.स्टे.कडील -०१ गुन्हा व साक्री पोलीस स्टेशन.कडील -०१ गुन्हा असे एकुण ०२ गुन्हयांची उकल करण्यात आली आहे.

सदरची कारवाई ही मा.पोलीस अधीक्षक सो.श्री माहेश्वर रेड्डी सो. मा. अप्पर पोलीस अधीक्षक सो. अशोक नखाते, मा. उप विभागीय पोलीस अधिकारी श्री.नितीन गणापुरे, मा.पोलीस निरीक्षक सागर शिंपी यांचे मार्गदर्शनाखाली जळगांव शहर पो.स्टे.च्या गुन्हे शोध पथकातील सफौ/सुनिल पाटील, पोहेकॉ/उमेश भांडारकर, पोहेकॉ/सतिश पाटील, पोहेकॉ/योगेश पाटील, पोहेकॉ/नंदलाल पाटील, पोहेकॉ/विरेंद्र शिंदे,पोहेकॉ दिपक शिरसाट, पोहेकॉ/भगवान पाटील, पोना सुधिर साळवे, पोकॉ अमोल टाकुर, पोकॉ/भगवान मोरे, पोकॉ प्रणय पवार,पो.कॉ.राहुलकुमार पांचाळ अशांनी केली आहे.

